**निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी**
**शासकीय खाजण जमिनी भाडेपट्ट्याने देण्याबाबत.**
**शासकीय धोरण- सुधारणा**

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.निखायो १४९२/प्र.क्र.१६३/ पदुम-१२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २८ एप्रिल, २००६

वाचा : १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई क्र.निखायो १४९२/प्र.क्र.१६३/पदुम-१२, दि.२३/११/२००१
२) शासन निर्णय, पर्यावरण विभाग क्र.इएनव्ही-२००१/१८३/प्र.क्र.३१/तां.क-१, दि.२५/१०/२००१
३) शासन पूरक पत्र, कृषि व पदुम विभाग क्र.निखायो १४९७/प्र.क्र. १६३/ पदुम-१२, दि.१५/३/२००३ व दि.२०/१०/२००३

**प्रस्तावना :**

शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्र.निखायो १४९२/प्र.क्र.१६३/पदुम-१२, दि.२३/११/२००१ अनुसार निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमिनी भाडेपट्ट्याने देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. कोस्टल झोन अधिसूचनेनुसार तिवरांच्या क्षेत्राचे वर्गीकरण हे सी.आर.झेड (१) मध्ये करण्यात आलेले आहे. सी.आर.झेड.अधिसूचनेतील परिशिष्ट १ मधील परिच्छेद-६ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार काही विशिष्ट कामे वगळता सी.आर.झेड. (१) क्षेत्रात कोणत्याही नवीन कामास परवानगी देण्यात येत नाही. तिवरांच्या अवैध तोडीच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र.३२४६/०४ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी तिवरांचे क्षेत्र हे भारतीय वन कायद्यांतर्गत "संरक्षित वने" म्हणून जाहीर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

**शासन निर्णय :**

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेले आदेश लक्षात घेऊन वन संवर्धन अधिनियम १९८० च्या तरतुदीनुसार निमखा-या पाण्यावर मत्स्योत्पादन करण्यासाठी शासकीय खाजण जमीन भाडेपट्टीने देण्याबाबतचे शासकीय धोरण राबविताना तिवरांची झाडे असलेल्या क्षेत्रात कोळंबी संवर्धन/ मत्स्योत्पादनासाठी खाजण जमीन उपलब्ध करुन देण्यात येऊ नये असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

त्यास अनुसरुन शासकीय जमिनी भाडेपट्टीने देताना तिवरांची झाडे असलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील जमिनी मत्स्योत्पादनासाठी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही संबंधित अधिका-यांनी करावी. तसेच, वन क्षेत्रातील तिवरांची झाडे असलेल्या क्षेत्राचा -हास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( म.ह.सोनकुसरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव,
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव,
सर्व विधानसभा आणि विधान परिषद सदस्य,
आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
विभागीय आयुक्त, मुंबई,
आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर/ ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग,
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, कोकण विभाग, नवीन मुंबई,
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,
व्यवस्थापकीय संचालक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, ठाणे,
व्यवस्थापकीय संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, अलीबाग,
व्यवस्थापकीय संचालक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती मच्छिमार सहकारी संघ, रत्नागिरी,
महालेखापाल (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
सर्व कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, पदुम-१२